आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, ७ सप्टेंबर २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ४५ । पाने : ४ । मूल्य २ ₹



गणेशोत्सवाच्या गणेशभक्तांना हार्दिक शुभेच्छा!
: संपादक



## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस स्वबळावर लढणार

### नवे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांची माहिती; निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देणार

▶ बाबा श्रीहरी देशमाने

अंबाजोगाई : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस स्वबळावर लढवणार असल्याची माहिती काँग्रेस कमिटीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर वर्तमानने साधलेल्या संवादात राजेसाहेब देशमुख यांनी विविध मुद्यांवर चर्चा केली. देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्ष हा न संपणारा विचार आहे. तो तळागाळातील शेवटच्या माणसांपर्यत रूजलेला आहे. देशाची इकॉनॉमी काँग्रेस पक्षाने उभी केली. भविष्यातही देशाची आर्थिक घडी बसविण्यासाठी काँग्रेसशिवाय पर्याय नाही, असेही देशमुख म्हणाले. बीड जिल्ह्यात काँग्रेसला उर्जितावस्था मिळून देण्यासाठी व्यापक प्रयत्न करणार आहे. संपूर्ण जिल्ह्यात तालुकावार बैठकांचे आयोजन करून क्रियाशील आणि पडत्या काळात काँग्रेसचा विचार तेवत ठेवणाऱ्या तरूणांची तालुकाध्यक्षपदी वर्णी लावणार आहे. चमकोगिरी करणाऱ्या अतिउत्साही कार्यकर्त्यांना बाजूला सारून निष्ठावंत कार्यकर्त्यांना पदे दिली जातील असेही देशमुख यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष संघटन वाढविण्यासाठी व्यापक काम करण्याची गरज आहे. गाव तिथे शाखा हा उपक्रम राबवून स्थानिक स्वराज्य संस्थेत काँग्रेसची चमक दाखवून देवू. जिल्ह्यात काँग्रेसचा एकही आमदार नाही, सत्तेत सहभागी नाही. सत्तेविना जिल्ह्यात काम करणे आव्हान असले तरी ते लिलया पार पाडू, असा विश्वास राजेसाहेब देशमुख यांनी व्यक्त केला.

### तळागाळातील माणसांचा नेता

अगदी विद्यार्थी दशेपासून राजेसाहेब देशमुख राजकारणात सक्रिय आहेत. विविध आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांना न्याय मिळवून दिला आहे. अंबाजोगाई तालुक्यातील ८ हजारांवर लोकांना संजय गांधी निराधार योजनेची पेन्शन मिळवून देण्याचे काम देशमुख यांनी केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, पंचायत समितीचे उपसभापती, जिल्हा परिषदेचे सभापती, महाबीजचे संचालक आदी पदांना न्याय देत अतिशय प्रभावी काम देशमुख यांनी केलेले आहे. या कामाची पावती म्हणून काँग्रेस कमिटीने त्यांच्यावर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी टाकली आहे. तळागाळातील माणसांचा नेता अशी ओळख देशमुख यांची बीडच्या राजकारणात आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

## फास्टट्रॅकन्यूज

### नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करा : खासदार प्रितम मुंडे



बीड : खरिपातील पिकांना बहर आलेला असतानाच अवेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांची भेट घेऊन नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना केल्या आहेत. पेरणीपूर्वी आणि त्यानंतर झालेल्या पावसामुळे खरीप पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले होते, यंदा पावसाने दिलेल्या साथीमुळे चांगले पीक येण्याची चिन्हे असतानाच अवेळी झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घातली. जिल्ह्याच्या बहुतांश भागात पिकांचे नुकसान आणि घरांची पडझड झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यांनाही भरपाई देण्याच्या सूचना केल्या.

### केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांचे ओमप्रकाश शेटे सहाय्यक सचिव



बीड : मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे माजी प्रमुख ओमप्रकाश शेटे यांची केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांचे खाजगी सहाय्यक सचिव म्हणून नियुक्त झाले आहेत. दिंद्रुड येथे त्यांच्या नियुक्तीबद्दल स्वागत स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रीय आयुष मंत्रालयाचे संचालक तथा शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे, मराठा आरक्षण संघर्ष समन्वय समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सुभाष जावळे पाटील, संभाजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा.रामेश्वर शिंदे, परभणी भाजपा उपाध्यक्ष सुभाषराव आंबट, सोमनाथराव बडे, उद्योजक राजाभाऊ निर्मळ, उदयसिंह दिख्खत आदींसह विविध पक्षांचे व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### पावसाची धुव्वाधार बॅटिंग; शेतात घुसले पाणी

बीड : जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावलेली आहे. शनिवारी रात्रीपासून मेघगर्जनेसह जिल्ह्यात धुव्वाधार पावसाने कमबॅक केले. काही भागात मध्यम तर काही भागात जोरदार पाऊस बरसला. यात अंबाजोगाई, वडवणी, गेवराई माजलगाव या तालुक्यांना पुन्हा एकदा पावसाने झोडपले. मोठ्या पावसामुळे नद्या नाले ओढे खळखळून वाहू लागले आहेत. अनेक नदी ओढ्याचे पाणी शेतकऱ्यांच्या पुन्हा पिकांमध्ये घुसले आहे. त्यामुळे शेती पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. एकूणच जिल्ह्यामध्ये रात्री झालेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## दादांच्या सूनबाई लवकरच राजकारणात?

▶ भगीरथ तोडकरी

माजलगाव : जिल्ह्याच्या राजकारणात सोळंके घराण्याचे वेगळे अस्तित्व आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या सूनबाई पल्लवी विरेंद्र सोळंके या लवकरच राजकारणात सक्रिय होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त 'वर्तमान'च्या हाती लागले आहे. दरम्यान, या वृत्ताला त्यांच्या समर्थकांमधून दुजोरा मिळत असल्याचे बोलले जात आहे.

बीड जिल्ह्याच्या राजकारणात सोळंके घराण्याचा मोठा दबदबा आहे. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते सुंदरराव सोळंके यांची तिसरी पिढी राजकारणात सक्रिय होताना दिसत आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा लोकनेते सुंदरराव सोळंके यांचे सुपूत्र प्रकाश सोळंके हे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. त्याचबरोबर प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिंग सोळंके हे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय झालेले आहेत.

आता आमदार प्रकाश सोळंके यांच्या सूनबाई पल्लवी विरेंद्र सोळंके या स्थानिक राजकारणात सक्रिय होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. पल्लवी सोळंके यांचा गेल्या २३ ऑगस्ट रोजी वाढदिवस साजरा झाला. या वाढदिवसाच्या निमित्ताने शहरातील काही ठिकाणी मोठे फलक लावण्यात आले होते.

या बाबतही राजकीय वर्तुळात चर्चेला सुरूवात झाली आहे. सोळंके घराण्याचे समर्थक अशोक राऊत यांनी शिंपेटाकळी येथे पल्लवी सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण केले. गेल्या काही महिन्यांपासून पल्लवी सोळंके यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्येही सहभाग घेतलेला आहे. माजलगाव तालुक्याच्या सहकार, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात सोळंके परिवाराने मोठे काम उभे केलेले आहे.

किंबहुना याच कामाच्या जोरावर सोळंके घराणे राजकारणात तग धरून आहे. बीड जिल्हा परिषदेचे सभापती तथा युवा नेते जयसिंग सोळंके यांच्यानंतर पल्लवी सोळंके यांच्या रूपाने सोळंके घराण्यातील तिसरी पिढी सक्रिय होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त 'वर्तमान'च्या हाती लागले आहे. याबाबत सोळंके घराण्याच्या निकटवर्तीयांकडून दुजोरा मिळत आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्था की विधानसभा?

पल्लवी विरेंद्र सोळंके या विधी शाखेतील उच्च विद्या विभूषित असून मितभाषी व मनमिळाऊ स्वभावाच्या आहेत. विविध महिला बचत गटाच्या माध्यमातून त्यांचा जनसंपर्कही चांगला आहे. सोळंके या आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका की विधानसभा निवडणूक लढविणार याबाबत मात्र सर्वकाही गुलदस्त्यात आहे. मात्र माजलगाव नगरपालिकेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार त्या नगरपालिका निवडणूक लढवतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.



## ज्ञानेश्वरी अर्बनची अल्पावधीत गरूडझेप

### ठेवी पोहचल्या १२ कोटी पर्यंत
### ग्राहकांचा विश्वास संपादन

**माजलगाव : येथील ज्ञानेश्वरी अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटीने अल्पावधीतच सहकार क्षेत्रात गरूडझेप घेतली आहे. केवळ ३ वर्षात तब्बल १२ कोटींच्या ठेवी मिळवून ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. माजलगावच्या सहकार क्षेत्रात ज्ञानेश्वरी अर्बनने आपली वेगळी ओळख निर्माण करून प्रगतीकडे वाटचाल सुरू केली आहे. या प्रगतीवर तृतीय वर्धापनदिनाच्या निमित्ताने 'वर्तमान'ने टाकलेला प्रकाशझोत.**

▶ विशेष प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात असलेल्या फुलेपिंपळगाव येथील रामराव फुलगे या शेतकरी कुटुंबात राहुल फुलगे यांचा जन्म झाला. वडील सेवा सोसायटीचे उपाध्यक्ष, पोलिस पाटील. तीन मुलांना उच्चशिक्षण दिले. मोठा मुलगा बप्पासाहेब हे ग्रामपंचायतचे सदस्य आहेत, तर सहदेव हे शेतीव्यवसाय सांभाळतात. लहानपणापासूनच राहुल यांना सामाजिक कार्याची आवड होती. पदवीपर्यतचे शिक्षण घेतल्यानंतर शहरातील एका पतसंस्थेत पाच वर्षे काम केले. परंतु, केवळ दुसरीकडे काम करून रोजगार मिळविण्यापेक्षा इतरांना रोजगार मिळवून देण्याकरिता काम केले पाहिजे, या उद्देशाने दि. १२ सप्टेंबर २०१८ रोजी ज्ञानेश्वरी अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटीची केवळ १५ लाख तीस हजार रूपये भागभांडवलावर सुरूवात केली होती. आज हे भागभांडवल १२ कोटी वीस लाख रूपये इतके झाले असून सतरा कर्मचाऱ्यांना काम करण्याची संधी निर्माण करून दिल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे ज्ञानेश्वरी अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल फुलगे यांनी वर्तमानशी सांगितले. राहुल फुलगे यांचे शिक्षण बी.कॉम. पदवीपर्यत पूर्ण झाले आहे. गावाकडील शेतीव्यवसाय सांभाळत २०१३ ते २०१८ अशी पाच वर्षे शहरातील एका पतसंस्थेमध्ये काम करत सहकार क्षेत्राचा अनुभव घेतला. सहकार क्षेत्रात काम करत असताना केवळ स्वतःला रोजगार मिळाला म्हणून केवळ नोकरीपुरते मर्यादित न राहता सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले पाहिजे तसेच समाजातील तळागाळातील वंचित उपेक्षितांना, ज्यांची बाजारात पत नाही अशा सर्वसामान्यांना पतपुरवठा झाला पाहिजे, लघुउद्योजकांना उद्योगांकरिता कर्जपुरवठा मिळविण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांत होणाऱ्या अडवणुकीमुळे आर्थिक अडचणी निर्माण होत होत्या. या सर्वाच्या एकत्रित समस्या मार्गी लागल्या पाहिजेत, या उद्देशाने ज्ञानेश्वरी अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटीची सुरूवात करण्यात आली. संस्थेने शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानत तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शेतीकामासाठी कर्जवाटप केले आहे. या संस्थेत कर्जवाटपात शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते. कोरोनाच्या लढ्यामध्ये शेतकऱ्यांना कर्ज मिळविण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना तात्काळ कर्जपुरवठा झाला पाहिजे यासाठी काही तासांत कर्ज उपलब्ध अशी योजना सुरू केली असून या सोने तारण कर्ज योजनेअंतर्गत ६५ लाख रूपयांचे कर्जवाटप करत लॉकडाऊनमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे करत असताना ठेवींवर ८ टक्के ते १२ टक्केपर्यत व्याज देण्यात येते. शाखाविस्तार करण्यापेक्षा एका शाखेतूनच ग्राहकांना दर्जेदार सुविधा मिळाली पाहिजे. ग्राहकांच्या विश्वासाला तडा न गेला पाहिजे, याकरिता एकच शाखा सुरू ठेवण्यात येणार असून ही शाखा अद्ययावत फर्निचर व संपूर्णरित्या संगणकीकृत करण्यात आली आहे. स्वतःचा आयएफएससी कोडदेखील या संस्थेने मिळविला आहे. शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करत ही संस्था कार्यरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत ज्ञानेश्वरी अर्बन पुढील वाटचाल करत आहे.



राहुल फुलगे

### सामाजिक कार्यातही योगदान

पूरग्रस्तांना मदत असो अथवा कोरोनाच्या लढ्यामध्ये मुख्यमंत्री सहायता निधीस मदत असो, ही संस्था नेहमीच सामाजिक कार्यात पुढाकार घेते. संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातातच, परंतु या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल फुलगे स्वखर्चातून गरजवंतांना, अपघातग्रस्त तसेच गोरगरिबांच्या विवाहाकरिता कसल्याही प्रकारचा गाजावाजा न करता आर्थिक मदत करतात. हे संस्थेचे वेगळेपण आहे. कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनमध्ये शेतकरी, सर्वसामान्यांना बँक व्यवहारात अडचणी निर्माण होऊ नयेत तसेच कर्जपुरवठा करण्यासाठी कागदपत्रांची अडचण येणार नाही यादृष्टीने कमीत कमी कागदपत्रांनी अवघ्या काही तासांत ग्राहकांना कर्ज उपलब्ध करण्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या तर ग्राहकांना पैसे ठेवणे अथवा काढण्यासाठी ज्ञानेश्वरी अर्बनने घरपोच सुविधा पुरविली आहे.ग्रामीण भागात लॉकडाऊनच्या काळात सलग ३८ दिवस अन्नदान करण्याचे काम संस्थेने केले आहे.




### आजमितीला संस्थेची प्रगती

- भागभांडवल : १२ कोटी २० लाख
- कर्जवाटप : ७ कोटी ८५ लाख
- गुंतवणूक : ३ कोटी ७० लाख
- सभासद संख्या : ७०००
- खातेदार : ३८००
- कर्मचारी : १७



### शेतीपूरक व्यवसायावर भर देणार : राहुल फुलगे

भविष्यात शेतीपूरक व्यवसायासाठी व्यापक काम उभारणार असून २१ कोटी ठेवींचे उद्दीष्ट डोळ्यासमोर असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल फुलगे यांनी 'वर्तमान'शी सांगितले. सहकार क्षेत्रातील नव तरूणांना संदेश देताना फुलगे म्हणाले, माजलगाव तालुका सिंचनासह विविध क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. नवनवीन प्रकल्प येत आहेत. त्यामुळे सहकार क्षेत्रात उतरणाऱ्या तरूणांचे स्वागत झाले पाहीजे. संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढ व्हावी, ग्राहकांना दर्जेदार सेवा देतानाच पारदर्शक व्यवहारावर भर द्यावा असाही सल्ला फुलगे यांनी दिला.



## संपादकीय

# सर्वसमावेशक विकासासाठी हवी जातनिहाय जनगणना!

भारतात राजकारणासारखा कळीचा आणि संवेदनाशील मुद्दा अन्य कोणता नसेल. देशात राजकारण आणि जात हे दोन्ही शब्द समानार्थी वाटावेत, असे अनेक प्रसंग घडतात. किंबहुना जातीच्या अवतीभवतीच अनेकांची राजकीय कारकीर्द फुलल्याचे दिसून येते. मुद्दा मग अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा असो अथवा अनुसूचित जमाती वा ओबीसींचा! राजकारण म्हटले, तर जातीय समीकरणे आलीच आणि याच जातीय समीकरणांमुळे आता जातनिहाय जनगणनेचा मुद्दा राजधानीत बराच तापतोय. एकेकाळी बिहार राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे आणि सध्या मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे कट्टर विरोधक आरजेडी'चे नेते तेजस्वी यादव यांनी थेट नितीश कुमारांच्या शिष्टमंडळात येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. इतर मागासवर्गीयांची जातनिहाय जनगणना करण्याची मागणी या शिष्टमंडळाकडून करण्यात आली. तेजस्वी यांचा शिष्टमंडळात सामील होण्याचा उद्देश दुसरा कुठला जरी असला, तरी राजकीय वातावरण तापवण्याचे काम या शिष्टमंडळाने केले. बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी मागणी केल्यानंतर आता इतर राज्यांतील मुख्यमंत्री देखील ओबीसींची, किंबहुना जातनिहाय जनगणेची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक राजकारण, राजकीय हितसंबंधांचा मुद्दा सोडला, तर संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान करण्यात आलेल्या १२७ व्या घटनादुरुस्तीनंतरच विरोधकांनी जातनिहाय जणगणना करून आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा दबाब केंद्र सरकारवर निर्माण केला आहे. लोकसभा आणि राज्यसभेतील चर्चावरून हे स्पष्ट होते. सर्वच राजकीय पक्षांनी घटनादुरुस्ती विधेयकाचे स्वागत केले; परंतु इतर मागासवर्गीयांच्या मुद्द्यावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. ओबीसींच्या जणगणनेचा मुद्दा आता राजधानीसह इतर राज्यांमध्ये तापवला जातोय. महाराष्ट्रात ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा मुद्दा अगोदरपासूनच तापला आहे. केंद्राने ओबीसींचा इम्पेरिकल डेटा राज्यांना तातडीने पुरवावा, अशी मागणीच महाविकास आघाडीने केली आहे. सरकारच्या या मागणीमागे ओबीसींच्या राजकीय आरक्षणासह इतरही कारणे आहेत. नुकत्याच करण्यात आलेल्या घटनादुरुस्तीनंतर ओबीसी प्रवर्गाची यादी तयार करण्याचे अधिकार राज्यांना मिळाल्याने अनेक वर्षापासून आरक्षणाची मागणी करणाऱ्या समाजाचा अभ्यास करून त्यांना ओबीसींच्या यादीत समाविष्ट करण्याचा, प्रसंगी यासंबंधी श्रेय घेण्याची संधी राज्यांना मिळेल. महाराष्ट्रात मराठा समाजाला तसेच हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील जाट समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याचा मार्ग घटनादुरुस्तीनंतर बऱ्यापैकी सुकर झाला आहे; परंतु, हा मार्ग अधिक सुकर करण्यासाठी केंद्र सरकारवर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा संपुष्टात आणण्याचा दबाब आणखी वाढला आहे, हे देखील तेवढेच खरं आहे. मुळात आपल्या देशात ओबीसींची संख्या ५४ टक्के आहे. ज्याप्रमाणे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या माहिती झाल्यानंतर केंद्र सरकारने निधी देत त्यांची स्थिती सुधारावी यासाठी त्यांच्या शाळा, आरोग्य, नोकऱ्या, शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी बरेच प्रयत्न केले, त्याचप्रमाणे इतर मागास वर्गीयांना मदत करायची असेल तर त्यांची जणगणना करणे महत्त्वाचे ठरेल. या पूर्वीच्या सर्वच सत्ताधाऱ्यांनी हे मान्यसुद्धा केले आहे. भारतातली जनगणना फक्त ओबीसी आधारित नाही, तर जातनिहाय झाली पाहिजे. विशेष म्हणजे जातीनिहाय जनगणना करताना ती लिंगाधारीत केली पाहिजे. यातून स्त्री-पुरुषांची संख्या कळेल; परंतु अजूनही समाजातील शोषित, वंचितांची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही. २०११ च्या जनगणनांच्या आधारे सरसकट ओबीसी ५२% आहेत असे म्हणणे किंवा एससींचे प्रमाण, एसटींचे प्रमाण सांगणे योग्य नाही. समाज बदलताना आर्थिक-सामाजिक बदल घडत असल्याने जातिनिहाय जनगणना करण्याची मागणी वारंवार केली जाते. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीयव्यवस्था नष्ट व्हावी, या उद्देशाने आरक्षण दिले होते. सुरुवातीला अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यापुरतं हे आरक्षण मर्यादित ठेवण्यात आले. पुढे त्यात इतर मागास जाती, अल्पसंख्याक आदींची भर पडली. पुढे ५२ टक्के ओबीसींच्या २७% आरक्षणावर शिक्कामोर्तब झाले. आता ओबीसींच्या यादीत आरक्षणापासून वंचित असलेल्यांचा समावेश करण्यासाठी व्यापक दृष्टिकोनातून सरकारांनी सर्वसमावेशक निर्णय घेणे अपेक्षित आहे. वास्तविक जनगणना हा एकूण देशाच्या विकासाच्या संदर्भातला महत्त्वाचा मुद्दा असतो. देशातल्या जनतेची गणना ही विविध सामाजिक-आर्थिक गोष्टी लक्षात घेऊन केली जाते. जनतेच्या कल्याणासाठीच्या कोणत्याही योजना आखायच्या असतील, त्याच्यासाठीची धोरणे ठरवायची असतील, तर मुळात या योजना कोणाला द्यायच्या आहेत, याच्यासाठी एक संख्याशास्त्र, माहिती देशाच्या सरकारकडे असणे आवश्यक असते. म्हणून याही संदर्भात जनगणना महत्त्वाची असते. लोकसंख्या सोबतच जनतेला मिळणाऱ्या सोयीसुविधा, राहणीमान जनगणनेतून अधोरेखित होत असते. विकासाच्या प्रक्रियेत जे लोक नाहीत, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम देशाच्या सरकारचे असते. अशात सर्वसमावेशक विकासासाठी जातनिहाय जनगणना करणे आवश्यक असल्याचा पर्याय तूर्त दिसून येतो. मात्र त्याचे परिणाम भविष्यात लक्षात येतील.

# 'नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाईन' ची व्याप्ती

**अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी नुकतीच 'नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाईन' योजना जाहीर केली. सार्वजनिक संपत्ती पुढच्या चार वर्षासाठी खाजगी कंपन्यांना भाडेतत्त्वावर देण्याची ही योजना आहे. त्यातून ६ लाख कोटी उभे राहतील असं सरकारला वाटतंय. पण त्यावरून वादळ उठलंय. या योजनेआडून मोदी सरकार देशाची संपत्ती बड्या उद्योगपतींकडे देत असल्याचा आरोप विरोधी पक्ष करतायत.**

**अर्थकारण**

**अक्षय शारदा शरद**



२०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वीचं प्रचाराची रणधुमाळी आठवून बघा. सगळं वातावरण कसं मोदीमय झालं होतं. 'अबकी बार, मोदी सरकारचे' बॅनर सगळीकडे लागलेले असायचे. नरेंद्र मोदींच्या सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद असायचा. सभेतली एक-एक घोषणा कार्यकर्त्यांचं बळ वाढवणारी असायची.

भाषणांमधून भ्रष्टाचार, काळा पैसा, पेट्रोल-डिझेल, गॅसचे वाढणारे दर असे कित्येक मुद्दे मांडले जायचे. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा करायचं आश्वासन दिलं जायचं. लोकांना खरं वाटायचं. टाळ्यांचा प्रतिसाद मिळायचा. अर्थात हा केवळ जुमला होता हे सत्तेत आल्यावर गृहमंत्री अमित शहा यांनी स्वतःच जाहीर केलं. 'वो बेच रहें हैं भारत को, खामोश मैं कैसे हो जाऊ? मैने कसम उठाई हैं, मैं देश नहीं मिटनें दूंगा, मैं देश नहीं झुकने दूंगा'. असं म्हणत नरेंद्र मोदी तत्कालीन यूपीए सरकारवर टीका करायचे. ही शपथ मात्र सत्तेत आल्यावर १५ लाखांच्या जुमलेबाजी सारखीच इतिहासजमा झाली. त्यावर कुणी बोललं की त्याला थेट देशविरोधी असल्याची लेबलं लावली जातात. अशाच कारभारामुळे कधी रिझर्व बँकेचे पैसे परस्पर सरकारकडे वळवले गेले. बड्या उद्योगपतींचं कर्ज तात्काळ माफ केलं गेलं. तर कधी खाजगी कंपन्यांच्या फायद्याची गणितं आखली जातात. आता तर थेट मोदी सरकारनं देशातली सार्वजनिक संपत्ती भाडेतत्त्वावर द्यायची योजना आणलीय.

योजनेचं सूतोवाच भाषणांमधून

अर्थमंत्री निर्मला सीतारमण 'नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाईन' अर्थात एनएमपीअंतर्गत सार्वजनिक संपत्ती केवळ भाडेतत्त्वावर दिली जाईल असं म्हटलंय. यात पुढच्या ४ वर्षासाठी सार्वजनिक क्षेत्रातली १३ क्षेत्र खाजगी क्षेत्राकडे जातील. त्यातून पुढच्या चार वर्षात ६ लाख कोटी उभे केले जातील असं सरकार म्हणतंय. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याआधीच लाल किल्ल्यावरच्या भाषणांमधून या योजनेचं सूतोवाच केलेलं होतं. २०१९ च्या भाषणात त्यांनी आधुनिक पायाभूत सुविधांसाठी आपण १०० लाख कोटी उभे करू असं जाहीर केलं होतं. तर २०२० च्या भाषणात ११० लाख कोटी खर्च केले जातील असं म्हटलं. २०२१ च्या लाल किल्ल्यावरच्या भाषणात पुन्हा युवकांना रोजगार देणारी १०० लाख कोटींची योजना आपण आणत असल्याचं मोदींनी जाहीर केलं होतं. निर्मला सीतारमण यांनी योजना जाहीर करताना रोजगार निर्माण करण्यासाठी हे महत्वाचं पाऊल असल्याचं जाहीर केलंय. या योजनेमुळे ग्रामीण आणि निमशहरी भाग एकमेकांना जोडले जाण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केलाय. याआधी त्यांनी बजेटच्या भाषणात मॉनेटायझेशन हे नवीन पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी एक महत्वाचा आर्थिक पर्याय असल्याचं म्हटलं होतं.

सार्वजनिक संपत्ती भाडेतत्त्वावर

'नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाईन' या योजनेत वीजनिर्मिती प्रकल्प, रेल्वे, रस्ते, पाईपलाईन असतील. यातला रस्ते, रेल्वे, वीजनिर्मितीसंबंधी इमारती आणि सुविधांचा वाटा ६६ टक्के तर इतर सुविधा या ३४ टक्के असतील असं अर्थ खात्याचे या योजनेसंदर्भातले आकडे सांगतायत. आकड्यांचाच विचार करायचा तर एनएमपीमधे २६,७०० किलोमीटरचे देशातले २२ टक्के रस्ते, १६० कोळशाच्या खाणी, ४०० किलोवॅटचे वीजनिर्मिती प्रकल्प, २८,९०० कोटी उभे करण्यासाठी देशातली गोदामं, ८१५४ किलोमीटरची नैसर्गिक गॅस पाईपलाईन, ३९३० किलोमीटरच्या पेट्रोलियम पाईपलाईनचं खाजगीकरण केलं जाईल.

याशिवाय दूरसंचार क्षेत्रातले बीएसएनएल, एमटीएनएलचे टॉवर, २.८६ लाख किलोमीटरच्या ऑप्टिकल फायबर केबलही भाड्याने दिल्या जातील. तसंच देशातली २५ एयरपोर्ट यात असतील. रेल्वे आपल्या जिव्हाळ्याचा विषय. पण मोदी सरकारच्या या योजनेतून ४०० रेल्वे स्टेशन, ९० प्रवासी ट्रेन, तसंच कोकण रेल्वेचंही खाजगीकरण होतंय.

योजनेची गरज का पडली?

एनएमपी ही योजना अर्थ खातं, नीती आयोग आणि पायाभूत सुविधा संबंधित खात्यांच्या एकत्रित चर्चेतून तयार करण्यात आलीय. २०२१-२०२२ चं बजेट सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अशी योजना येईल असं सांगितलं होतं. पण अशा योजनेची गरज का पडली? सध्या देश आर्थिक संकटातून जातोय. अर्थव्यवस्था ढासाळलीय. जीडीपी घसरलाय. अशावेळी वेगवेगळ्या पद्धतीने कर वाढवले जातात. महसूल गोळा केला जातो. गेल्यावर्षी आर्थिक तूट ९.४ टक्क्यांवर पोचली. सरकारची तिजोरी दिवसेंदिवस रिकामी होतेय. त्यामुळे सरकार सार्वजनिक मालमत्ता भाड्याने देत असावं असं बीसीसी हिंदीच्या एका लेखात म्हटलंय. हे मॉनेटायझेशन करत असताना त्याचा मालकी हक्क मात्र सरकारकडेच राहील असं सीतारमण यांनी स्पष्ट केलंय. याचा अर्थ खाजगी कंपन्या या केवळ या संपत्तीचा वापर करतील. पण खाजगी क्षेत्रानं एकदा नियंत्रण मिळवलं तर कंपन्यांच्या मनमानी कारभाराचं काय करणार असाही प्रश्नही उभा राहतोय.

बड्या उद्योगपतींची मक्तेदारी

विरोधी पक्षांनीही या योजनेवरून सरकारवर टीकेची झोड उठवलीय. ही योजना म्हणजे देश विकायची घोषणा असल्याचा आरोप मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं केलाय. आपल्या देशाची संपत्ती आणि अर्थव्यवस्थेची मूलभूत रचनेलाच उध्वस्त करायचा प्रयत्न सरकार करत असल्याचा आरोपही इतर विरोधी पक्ष करतंय. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी या योजनेवरून सरकारला धारेवर धरलंय. या योजनेचा फायदा केवळ चार-दोन मित्रांना होईल असं म्हणत त्यांनी थेट नरेंद्र मोदींना टार्गेट केलंय. अर्थव्यवस्थेवर या खाजगी कंपन्यांची मक्तेदारी आल्यामुळे बेरोजगारी अधिक वाढेल असं त्यांचं म्हणणं आहे.

माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनीही सरकारवर टीका केलीय. आर्थिक घडामोडींचे अभ्यासक, पत्रकार एनडी मुखर्जी यांचा 'ब्लूमबर्ग' साईटवर लेख आलाय. त्यात त्यांनी खाजगी कंपन्यांसंदर्भात एक महत्वाचा मुद्दा मांडलाय. जास्तीत जास्त फायदा व्हावा म्हणून या कंपन्या तशाच प्रकारची गणितं आखतील अशी भीती त्यांनी व्यक्त केलीय. रेल्वे आणि रेल्वे स्टेशनसारखं महत्वाचं साधन सरकारच्या जवळच्या एक दोन लोकांच्या हातात जाईल. ज्याचा पुरेपूर फायदा हे बडे उद्योगपती उचलतील. या सगळ्यावर तेच नियंत्रण मिळवतील असंही मुखर्जी यांनी म्हटलंय. त्याचा सगळ्यात जास्त तोटा हा सर्वसामान्य लोकांनाच होणार आहे.

# भाजपविरहित पर्याय आहे काय?

**सोनिया गांधींच्या नेतृत्वातल्या काँग्रेस पक्षाचा स्पष्ट उद्देश भाजपला हरवणं हाच आहे. त्यासाठी कोणताही त्याग करायला आणि भाजपविरहित कोणत्याही पर्यायी सरकारचा भाग व्हायला काँग्रेस तयार आहे. काँग्रेसला किमान १५० किंवा त्याहून अधिक जागा मिळतील, तेव्हाच काँग्रेस पंतप्रधानपदासाठी दावा करू शकेल. पण सद्यस्थितीत त्याची शक्यता खूपच कमी दिसते.**

**आज-काल**

**रशीद किडवई**



नरेंद्र मोदींचा करिष्मा संपत आलाय,' या आपल्याच प्रतिक्रियेमुळे विरोधी पक्षांमधे उत्साह येतो. एका माध्यम संस्थेनं नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेत मोठी घसरण पाहायला मिळाली. सद्यस्थितीत दोन गोष्टी मोदींना प्रतिकूल आहेत. एक म्हणजे, देशाची आर्थिक स्थिती आणि दुसरी म्हणजे, कोरोनाची साथ आटोक्यात आणण्यात सरकार कमी पडल्याची भावना. पण विरोधी पक्ष एकत्र येताना त्यांच्यात चतुराईचा अभाव दिसतो. विशेषतः उत्तर प्रदेशातल्या घडामोडी विरोधी पक्षांचं अपयश दाखवून देणाऱ्या आहेत.

विरोधकांच्या एकतेचं दर्शन

नुकत्याच झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी एकतेचं दुर्मिळ दर्शन घडवलं. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की, नव्या आघाडीत काँग्रेस थोरला भाऊ' नाही. सोनिया गांधी किंवा राहुल गांधी पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवत नाहीत, हीसुद्धा तेवढीच उल्लेखनीय गोष्ट आहे. या सगळ्याचा अर्थ विरोधी आघाडीमधे पंतप्रधानपद कोणाकडेही जाऊ शकेल. ममता बॅनर्जी बंगालच्या बाहेर आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न का करत आहेत आणि त्रिपुरा, आसाममधे आपली प्रतिमा का तयार करत आहेत, हेही यासंदर्भाने लक्षात येतं. येत्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला ५० पेक्षा अधिक जागा निवडून आणता येतील, अशी आशा त्या पक्षाला आहे. सुष्मिता देव यांनी काँग्रेसमधून तृणमूल काँग्रेसमधे केलेल्या प्रवेशाबद्दलही बरंच काही लिहिलं-बोललं गेलंय. पण समान विचारधारा असलेल्या एका मित्रपक्षात त्या गेल्या आहेत, हेही लक्षात घेतलं पाहिजे. तृणमूल काँग्रेसची स्थापना झाली तेव्हापासून काँग्रेस आणि तृणमूल या पक्षांदरम्यान पक्षांतरं पाहायला मिळाली आहेत. तृणमूल काँग्रेसमधले बहुतांश लोक पूर्वाश्रमीचे काँग्रेसजनच आहेत.पर्यायी सरकारसाठी काँग्रेस तयार

विरोधी पक्षांकडे एक स्पष्ट आराखडा असून, त्याची संकल्पना प्रसिद्ध निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी केली होती. हा आराखडा म्हणजे अनेक तत्त्वांचं मिश्रण आहे, असं म्हणता येईल. लोकसभेत बहुमतासाठी आवश्यक असलेला जादुई आकडा २७२ आहे. त्यातल्या निम्म्या म्हणजे १३६ जागा जिंकण्याची आशा काँग्रेसला आहे. बाकी अर्ध्या जागा बिगरकाँग्रेसी आणि बिगररालोआ पक्षांच्या खासदारांच्या असाव्यात, अशी ही योजना आहे. काँग्रेसला १५० किंवा त्याहून अधिक जागा मिळतील, तेव्हाच काँग्रेस पंतप्रधानपदासाठी दावा करू शकेल. पण त्याची शक्यता सद्यस्थितीत खूपच कमी दिसते.

सोनिया गांधींच्या नेतृत्वाखालच्या काँग्रेस पक्षाचा स्पष्ट उद्देश भाजपला हरवणं हा आहे. काँग्रेस २०२४ मधे पंतप्रधान मोदी यांना आणखी एक कार्यकाळ देऊ इच्छित नाही आणि त्यासाठी कोणताही त्याग करायला तयार आहे. भाजपविरहित अशा कोणत्याही पर्यायी सरकारचा भाग व्हायला काँग्रेस तयार आहे. अर्थ, गृह, परराष्ट्र व्यवहार अशा महत्त्वाच्या खात्यांवर काँग्रेसची नजर असेल. कारण, या विषयांमधे तज्ज्ञ आणि अनुभवाची काँग्रेसमधे कमतरता नाही. त्यामुळे अशा आघाडीत काँग्रेसचा दबदबाही कायम राहील.

वाजपेयींचाही पराभव झाला होता

मोदी नाहीत तर मग कोण?' हा प्रश्न विचारणं हा एक फॅशनेबल आणि अभिजात दृष्टिकोन आहे. अटलबिहारी वाजपेयी नाहीत तर मग कोण?' असा प्रश्न २००४ च्या निवडणुकीपूर्वीही विचारला गेला होता. त्यावर्षी निवडणुका होण्यापूर्वीच्या सर्व सर्वेक्षणांमधे अटलबिहारी वाजपेयी यांना आघाडी मिळणार असल्याचं दाखवण्यात आलं हेही लक्षात ठेवलं पाहिजे. त्या निवडणुकीचे निकाल आपल्याला माहिती आहेत. वाजपेयींना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला होता. निवडणुकीपूर्वी डॉ.मनमोहन सिंग यांच्या नावाची चर्चाही नव्हती आणि वाजपेयींचे प्रतिस्पर्धी म्हणून डॉ.मनमोहन सिंग यांच्या नावाचा उल्लेखही सोनिया गांधी यांनी कधीच केला नव्हता.

काँग्रेससमोर अनेक आव्हानंही

आपण विविध पक्षांच्या नेत्यांमधल्या संबंधांकडे पाहिलं, तर ते अधिक सौहार्दपूर्ण आणि मैत्रीपूर्ण आहेत, असं लक्षात येतं. शरद पवार, उद्धव ठाकरे, ममता बॅनर्जी, एम. के. स्टॅलिन यांच्यासह अनेक नेते आणि पक्षांचे, उदाहरणार्थ आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, बीजू जनता दल, एवढंच नाही, तर अकाली दल, वायएसआर काँग्रेस अशा पक्षांचे नेते कपिल सिब्बल यांच्या निवासस्थानी काँग्रेसमधल्या जी-२३ समूहाने आयोजित केलेल्या त्यांच्या जन्मदिवसाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. अर्थात, काँग्रेससमोर अनेक आव्हानं आहेत. पक्षाला पहिल्यांदा आपलं घर दुरुस्त करावं लागणार आहे. जोपर्यंत प्रशांत किशोर औपचारिकरीत्या काँग्रेसमधे सामील होणार नाहीत तोपर्यंत बिगररालोआ पक्षांमधला समन्वय आव्हानात्मक असणार आहे. काँग्रेसला अहमद पटेल यांची उणीव जाणवत आहे.

विरोधी पक्षांच्या यापूर्वीच्या ऑनलाईन बैठकीत बऱ्याच अडचणी आल्या होत्या. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या दिग्गज नेत्यांऐवजी काँग्रेसच्या सोशल मीडिया टीमचे काही कमी महत्त्वाचे पदाधिकारी विरोधी पक्षांचं सरकार असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करताना त्यावेळी दिसले होते.

मतदारांचा असाही पॅटर्न'

जर आपण १९८४, १९९९, २००९ आणि २०१९ या निवडणुका वगळून १९८० च्या दशकानंतरचा भारतीय मतदारांचा मतदानाचा पॅटर्न' बघितला तर असं लक्षात येतं की, लोक सामान्यतः बदल घडवून आणण्यासाठी मतदान करतात. ते सत्तारूढ पक्षाच्या विरोधात मतदान करतात. राजीव गांधी, व्ही.पी.सिंह आणि पी.वी.नरसिंहराव यांनाही निवडणुकीत पराभव पत्करावा लागला होता.

वाजपेयींनी १९९९ ला विजय मिळवला होता. कारण एकाच वर्षानंतर निवडणुका झाल्या होत्या. पण २००४ मधे त्यांचा पराभव झाला. सामान्यतः, मतदारांकडून सत्ताधारी पक्षाला कौल दिला जात नाही. मतदारांनी मोदींना दोनदा संधी दिली. २०२४ ला ते ७४ वर्षांचे असतील. २०२४ मधे भाजपला निर्णायक जनादेश मिळणार का, हा मुख्य प्रश्न आहे. काही लोक आतापर्यत असा तर्क मांडतात की, विरोधी पक्षांची बहुचर्चित आघाडी हे एक मृगजळ आहे.

२०२४ पर्यत चेकमेटचा खेळ

उत्तर प्रदेशातल्या निवडणुकां व्यतिरिक्त जुलै २०२२ ला होत असलेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत विरोधी पक्षांच्या एकीचा कस लागणार आहे. आगामी राष्ट्रपती निवडणुकीच्या दृष्टीने उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीचे निकाल महत्त्वाचे ठरणार आहेत. जर भाजपला विजय मिळाला, तर भाजपला जोरदार टक्कर देण्याची संधी विरोधी पक्षांना मिळणार नाही. या व्यतिरिक्त एखाद्या बहुचर्चित, सर्वसंमतीच्या अराजकीय व्यक्तीला मैदानात उतरवण्याचा पर्याय पंतप्रधान मोदी यांच्यापुढे असेल. जर त्यांनी अण्णा द्रमुक, बीजू जनता दल, बहुजन समाज पक्ष, वायएसआर काँग्रेस, तेलंगणा राष्ट्र समिती अशा काही प्रादेशिक पक्षांना आपल्या ताफ्यात सामील करून घेण्यात यश मिळवलं, तर विरोधी पक्ष भाजपला जोरदार टक्कर देऊ शकणार नाहीत. एकंदरीत, २०२४ पर्यत चेकमेटचा खेळ सुरू राहणार आहे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक आहेत)

# शेतकऱ्यांच्या हितासाठी 'अंबा साखर' कटिबद्ध

## अध्यक्ष रमेश आडसकर यांची ग्वाही; कठीण परिस्थितीतही कारखाना चालवला

▶ प्रतिनिधी



अंबाजोगाई : शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत अंबा साखर कारखान्याचा कारभार सुरू असून जनहितासाठी अंबा साखर कटिबद्ध आहे, अशी ग्वाही अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेश आडसकर यांनी शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम २०२०-२१ साली घेण्याचे संचालक मंडळाने ठरविले. हंगाम सुरू करीत असताना आर्थिक अडचणी होत्या. परंतु हा कारखाना टिकावा, या उद्देशाने गेल्या वर्षीच्या हंगामात कारखाना चालू ठेवला. कारखान्याने शेतकऱ्यांचे पैसे दिले. काम केलेल्या काळातील कामगारांचे पगारही केले.

मागील वर्षी २०२०-२१ साली हा कारखाना चालू करण्याचा निर्णय संचालक मंडळाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव घेतला. परत सभासदांकडून ठेवी घेतल्या. व्यक्तिगत नावे कर्जही काढले. कारखान्याच्या दुरूस्तीचे काम केले. नोव्हेंबर महिन्यात कारखाना सुरू झाला. अंदाजे हा कारखाना १०० दिवस चालला. परंतु, या १०० दिवसांमध्ये कारखान्याचे बॉयलरमध्ये सातत्याने बिघाड होऊन तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या.

फेब्रुवारी महिन्यामध्ये अचानक बॉयलर पुन्हा बंद पडल्यामुळे कारखाना बंद झाला. आर्थिक नुकसान झाले. कारखान्याने १ लाख ७३ हजार मे.टन उसाचे गाळप केले.

यातून १ लाख ३४ हजार क्विंटल साखर निघाली. ९ लाख लिटर स्पिरीट निघाले. याच्या विक्रीमधून जी रक्कम मिळाली त्यामधून ऊस बिलाच्या ७६ टक्के एवढी रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली, असेही आडसकर यांनी सांगितले.

### जमीन विकून ऊस बिले अदा

उर्वरित कमी पडलेली रक्कम शासनाने थकहमी देऊन सुद्धा बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिली नाही. त्यामुळे साखर आयुक्तांनी शेतकऱ्यांची राहिलेली २४ टक्के एवढी ऊस बिलाची रक्कम देण्यात यावी म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर आयुक्त व कारखान्यांकडे तगादा लावला. त्यामुळे साखर आयुक्तांनी कारखान्याची स्थावर मालमत्ता विकून उर्वरित शेतकऱ्यांची राहिलेली देणी देण्यात यावीत, असे आदेशित केले. साखर आयुक्त यांच्या आदेशानुसार कारखान्याच्या जमीन विक्रीतून जी मिळालेली रक्कम आहे. ती सर्व रक्कम शेतकऱ्यांचे खात्यावर वर्ग केली आहे, असेही रमेश आडसकर यांनी सांगितले.

# सावित्रीमाईंचा वारसा नेटाने पुढे चालवा : रूक्मिणी गायकवाड

▶ प्रतिनिधी

बीड : आजही केवळ अज्ञांपणामुळे पुरोगामी विचार न स्वीकारल्याने अनेक महिला जिवानिशी जात आहेत. स्त्री-पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूर्ती मर्यादित राहिली त्यामुळे आता फक्त त्यागमूर्ती माता सावित्रीबाई फुले यांचे विचार खऱ्या अर्थाने जतन करणे गरजेचे झाले असून त्यासाठी महिलांनी पुढे येण्याची नितांत गरज आहे, असे मत एकल महिला संघटनेच्या रुक्मिणी नागापुरे यांनी व्यक्त केले.

उमरद ता.बीड येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून गावातील सोबती गटाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत नागापुरे बोलत होत्या. समाजातील अनिष्ट रूढी परंपरा पाळल्याने महिला पुढे यायला अडचणी येतात.

त्यामळे महामानवाच्या विचाराची कास धरली तरच महिलांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो, असेही सांगितले. यावेळी विवाह नोंदणीचे भविष्यातील फायदे, यावरही चर्चा घडवून आणली. या बैठकीत सोबती गटातील महिलांनी रेश्मा सोनवणे, कौशल्या जाधव, कावेरी सोनवणे, राणी सोनवणे, संगिता सोनवणे, मिना कोल्हे, मंदाकिनी जाधव, वंदना वाघमारे, मनिषा थोरात आदींसह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष ठरतोय गरजूंना आधार

## आमदार चिमणराव पाटील यांचे गौरवोद्गार; जळगाव जिल्ह्यात मदत कक्षाची स्थापना

▶ प्रतिनिधी

जळगाव : वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा गरजू रूग्णांना मोठा आधार मिळत असून शिवसेनेने २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण हे ब्रीद सार्थ ठरविले आहे, असे गौरवोद्गार आमदार चिमणराव पाटील यांनी काढले. ते पारोळा येथे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.



पारोळा, एरंडोल, अमळनेर व भडगाव या तालुक्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्यात येत आहे. यासाठी पारोळा येथील कान्हूबाई औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या आवारात शिवसेना मदत कक्षाचे उद्घाटन आमदार चिमणराव पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आमदार चिमणराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व खासदार डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पारोळा बाजार समितीचे सभापती अमोल पाटील यांच्या प्रयत्नातून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कक्षप्रमुख मंगेश चिवटे, वैद्यकीय सहाय्यक स्वरूप काकडे, राजा भिलारे, डॉ.दिनकर पाटील, चतुर पाटील, जिजाबराव पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख प्रा.आर.बी.पाटील, वासुदेव पाटील, शहरप्रमुख अशोक मराठे, जि.प.चे माजी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर आमले, देवगाव सरपंच समीर पाटील, अनिल महाजन, अरुण पाटील उपस्थित होते. पारोळा कुटीर रूग्णातील वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रांजली पाटील, डॉ.योगेश साळुंके व वैद्यकीय कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर.बी.पाटील यांनी तर आभार प्रविण बिरारी यांनी मानले.

# धर्मनाथ देवस्थानची जमीन हडपण्याचा प्रयत्न

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहराचे ग्रामदैवत असलेल्या पुरातन धर्मनाथ समाधी देवस्थानवर नाव लावून मंदिर व जमीन हडपण्यासाठी काही जणांनी नगरपरिषदेकडे नाव लावण्यसाठी अर्ज केला आहे. परंतु या नाव लावण्याला हिंदू भाविक भक्तांनी मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी आक्षेप घेवून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.

मुख्याधिकारी यांना दिलेल्या आक्षेपात म्हटले आहे की, सिंदफणा नदीच्या काठावर शहराचे ग्रामदैवत असलेले पुरातन धर्मनाथ समाधी मंदिर व महालक्ष्मी अशी दोन मंदिरे आहेत. महसूल विभागाचे मंडळ अधिकारी माजलगाव यांनी दि.५ ऑगस्ट २०१५ रोजी केलेल्या पंचनाम्यात धर्मनाथ समाधी मंदिर व महालक्ष्मी मंदिर अशी दोन मंदिरे दाखविले आहेत. आणि दि.२८ ऑगस्ट २००६ रोजी तालुका भूमिअभिलेख माजलगाव यांनी मोजणी करून दिलेल्या नकाशात मंदिरे दाखवली आहेत. तरीही काही जणांनी गट नंबर



२२६ मधील सर्वे नंबर ३६९ मधील धर्मनाथ समाधी देवस्थान व जमिनीवर नाव लावण्यासाठी अर्ज केला. तेव्हा यासंदर्भात मुख्याधिकारी यांनी जाहीरनामा वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीस दिल्याने सदर अर्जावर हिंदू भाविक राजेभाऊ कुमावत, प्रताप लाटे, सिध्दार्थ साळवे, रामेश्वर विठ्ठल जमदाडे, दत्ता येवले, रामचंद्र दराडे, नरेंद्र डुकरे, मारोती सावंत, यांनी लेखी आक्षेप दिला आहे.

# गरूडझेप महिला ग्रामसंघाच्या अध्यक्षपदी शोभाताई गडसिंग



**शोभाताई गडसिंग**



**जनाबाई केकान**



**मंगलताई देशमाने**

▶ प्रतिनिधी

धारूर : महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने स्थापन झालेल्या गरूडझेप महिला ग्रामसंघ चाटगावच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या शोभाताई दीपक गडसिंग यांची बिनविरोध निवड झाली आहे. चाटगाव येथे नुकत्याच झालेल्या दहा बचत गटातील महिलांच्या साक्षीने ही निवड प्रक्रिया पार पडली.

उमेद अभियानाच्या अंतर्गत महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने गरूडझेप महिला ग्रामसंघ स्थापन करण्यात आला. या संघाच्या सचिवपदी जनाबाई आनंद केकान तर कोषाध्यक्षपदी मंगलताई सखाराम देशमाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी उमेदचे तालुका व्यवस्थापक ओंकार पंडीत, प्रभाग समन्वयक शामिवेल गावित यांनी काम पाहिले. चाटगाव येथील दहा महिला गटांचा समन्वय म्हणून गरूडझेप महिला ग्रामसंघ काम करेल. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने गरूडझेप ग्रामसंघ हे महत्वाचे पाऊल असून महिलांना लघुउद्योगाच्या माध्यमातून उद्योगी बनविण्याचे आपले स्वप्न असल्याची प्रतिक्रिया नवनिर्वाचित अध्यक्षा शोभाताई घडसिंग यांनी वर्तमानशी बोलताना दिली.

# विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र लसीकरण केंद्र हवे : क्षितिज गायकवाड

▶ प्रतिनिधी



माजलगाव : गेल्या दीड वर्षापासून देशातील शाळा व महाविद्यालये बंद असून विद्यार्थ्यांचे फार मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय स्तरावर स्वतंत्र लसीकरण सुरू करावे, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे माजलगाव शहराध्यक्ष क्षितिज गायकवाड यांनी केली आहे.

केंद्र सरकारने विद्यार्थ्यांसाठी कोरोना प्रतिबंधक लसींचा स्वतंत्र पुरवठा करून विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर स्वतंत्र लसीकरण करावे, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे माजलगाव शहराध्यक्ष क्षितिज गायकवाड यांनी केली आहे.

# परभणी रोड अपघातात जखमीचाही मृत्यू

## पुत्रापाठोपाठ पित्याचाही करूण अंत; रोषणपुरीतील डांगे कुटुंबियांवर काळाचा घाला





▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील परभणी रोडवर २ सप्टेंबर रोजी रात्री भरधाव कारच्या धडकेने १९ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला होता तर त्याचे वडील गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान ४ सप्टेंबर रोजी पहाटे वडिलांनीही प्राण सोडले.

माजलगाव येथून रोषणपुरी येथे गावी जाताना दुचाकीला भरधाव कारने धडक दिल्याची घटना २ सप्टेंबर रोजी रात्री घडली होती.

यात गणेश वसंत डांगे (वय १९) याचा जागीच मृत्यू झाला होता तर त्याचा भाऊ व वडील जखमी झाले होते. वडील वसंत आप्पासाहेब डांगे (वय ४२) यांच्यावर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयात उपचार सुरू होते. ४ सप्टेंबर रोजी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. मुलापाठोपाठ पित्याच्या मृत्यूने डांगे कुटुंबावर दुःखाचा दुहेरी आघात झाला आहे.

### डोंगर पट्ट्यात बैलपोळा उत्साहात



धारूर : तालुक्यातील कारी शिवारात पारंपरिक बैलपोळा साजरा करताना बबन मुंडे आणि परिवार.

# गोविंद केकान यांच्याकडे विकासाची दूरदृष्टी

## ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज यांचे कौतुक उद्गार

▶ प्रतिनिधी

किल्लेधारूर : युवा नेतृत्व गोविंद महादेव केकान यांच्याकडे विकासाची दूरदृष्टी असून त्यांना समाजाने मोठे समर्थन द्यावे, असे भावनिक आवाहन महाराष्ट्रातील प्रसिद्ध प्रबोधनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांनी चाटगाव येथे केले. गोविंद केकान यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित किर्तन सोहळ्यात पठाडे महाराज बोलत होते.

युवा नेतृत्व गोविंद केकान यांच्या वाढदिवसानिमित्त पंचक्रोशीत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले होते. त्या निमित्ताने प्रबोधनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांच्या किर्तन सोहळ्याचे आयोजन केले होते,

त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. वाढदिवसाच्या निमित्ताने ग्रामस्थांना स्नेहभोजन दिले. किर्तन सोहळ्यानंतर गोविंद केकान यांच्या समर्थकांमार्फत केक कापून वाढदिवस साजरा केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृष्णा हांगे, केशव केकान, सुदाम केकान, अर्जुन केकान, कृष्णा केकान, लक्ष्मण दराडे आदींनी परिश्रम घेतले.

### 'चाहत्यांच्या अलोट प्रेमामुळे भारावलो'

युवा नेतृत्व गोविंद केकान आपल्या मनोगतात म्हणाले, भविष्यात जनसामान्य लोकांच्या कल्याणासाठी काम करणार असून कुणाला कोणतीही मदत लागली तर हक्काने सांगा असे आवाहन गोविंद केकान यांनी केले. चाहत्यांच्या अलोट प्रेमामुळे अक्षरशः भारावून गेलो, असे उद्गार केकान यांनी काढले.



# लुप्त झालेले पानमळ्याचे गाव पुन्हा पानमळ्याकडे

## दिंद्रुड परिसरातील शेतकऱ्यांचा नागवेलीच्या पानाकडे कल

▶ विशेष प्रतिनिधी

माजलगाव : पूर्वी पान-मळ्याचं दिंद्रुड अशी गावाची ओळख होती. मात्र कालौघात बागायती क्षेत्र जिरायती झाले अन गावाचे वैभव लोप पावले. पावसाचं प्रमाण कमी होत गेल्याने जमिनीतील पाणीपातळी खालावली अन पानमळ्यांचा ऱ्हास होत गेला.

मात्र तब्बल ३० वर्षा नंतर पुन्हा नागवेलींच्या लागवडीकडे तरुण शेतकरी वळला असुन दिंद्रुडला 'पानमळ्याचे गांव' ही ओळख परत मिळणार असल्याने गावकरी आनंद व्यक्त करत आहेत.माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड गांव पानमळ्यासाठी प्रसिद्ध होते. इथले पान महाराष्ट्रात चवीने खाल्ले जायचे. मात्र शिवारातून वाहणाऱ्या नद्यांवर तलाव झाल्यामुळे बागायती शेती जिरायती झाली. शेकडोंच्या संख्येने असलेल्या मळ्यांवर नाविलाजाने कुऱ्हाड चालवावी लागली. मळ्यात काम करणारे शेकडो मजूर विस्थापित झाले. एकप्रकारे गावाच्या वैभवाला नजर लागली. गावचे भूमिपुत्र ओमप्रकाश शेटे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून मंत्रालयात रुजू झाल्यानंतर गावकऱ्यांनी त्यांचा



नागरी सत्कार केला होता. त्या कार्यक्रमात शेटे यांनी गावची पानमळ्याचे गांव ही ओळख परत निर्माण करण्याचे आपले स्वप्न असल्याचे सांगितले होते. त्यासाठी सरकार दरबारी विशेष प्रयत्न करुन शिवारात ४ नद्यांवर ११ बंधारे बांधून घेतले. साहजिकच बंधाऱ्यामुळे पाणीपातळीत वाढ झाली. त्यामुळे शेतकरी वर्ग बऱ्यापैकी समाधानी झाला आहे. यंदाही मुबलक पाऊस झाल्यामुळे शेटे यांनी स्वतःच्या शेतात नागवेलींच्या पानांची लागवड करुन गतवैभव प्राप्तीच्या दिशेने एक पाऊल टाकलं आहे. नुकतीच त्यांच्या शेतात नागवेलींची लागवड करण्यात आली. आगामी काळात अनेक तरूण शेतकरी पान मळ्यांची लागवड करण्यासाठी उत्सुक झाले आहेत. त्यामुळे दिंद्रुडला 'पानमळ्याचे गांव' ही ओळख परत मिळणार आहे.

### 'बागायती शिवारासाठी प्रयत्नशील'

माझ्या बालपणी गावात शेकडो पानमळे होते. शाळा सुटल्यावर आम्ही संदीपान चव्हाण यांच्या मळ्यात हमखास जायचो. पानांची दररोज विक्री होत असल्याने बागायतदार सधन होते. तर मजुरांच्या हाताला नियमित काम असल्याने ते सुद्धा खुश असायचे.

दिंद्रुड ही पंचक्रोशीतील नावाजलेली बाजारपेठ बनली होती. गावाचे हे गतवैभव परत यावे असे माझे स्वप्न आहे. त्यासाठी पुन्हा बागायती शिवार बनविण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, असे ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले.

### 'कामगारांच्या हाताला मिळणार काम'

गावात पानमळे लावण्यासाठी तरूण शेतकरी पुढे येत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. त्यामुळे कुशल कामगारांच्या हाताला काम मिळेल. मळ्यातील काम हे सावलीत असल्याने हे करताना वेगळा आनंद मिळतो, असे कामगार रामभाऊ कटारे यांनी सांगितले.

# माजलगाव धरण १०० टक्के भरले

## ११ दरवाजे खुले; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : जोरदार पाऊसामुळे माजलगाव धरण शंभर टक्के भरले असून तब्बल ११ दरवाजे दीड मिटरने खुले करण्यात आले आहे. सिंदफणा नदी पात्रात ६२ हजार ५१७ क्युसेस एवढा पाण्याचा विसर्ग सुरू आहे. दरम्यान, सिंदफणा नदीपात्रालगत असलेल्या सर्व गावांना प्रशासनातर्फे सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



माजलगाव धरण क्षेत्रात मागील दोन दिवसांपासून दमदार पाऊस पडत असल्याने धरण १०० टक्के भरले आहे. पाण्याची आवक वाढत असल्याने धरणाचे सोमवारी पहाटे ६ वाजता अकरा दरवाजे दीड मिटरने उघडण्यात आले. सध्या धरणातून सिंदफणा नदी पात्रात ६२ हजार क्युसेस एवढा पाण्याचा विसर्ग सुरू आहे. माजलगाव धरणाची यावर्षी पावसाळा सुरू झाल्यापासुनच पाणी पातळी वाढत होती. ऑगस्ट महिन्यात १५-२० दिवस पाऊस नसल्यामुळे पाणी पातळीत वाढ झाली नव्हती. मात्र, मागील दोन दिवसांपासून धरण परिसरात पडत असलेल्या पावसामुळे धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढली. हे धरण सोमवारी पहाटे पूर्ण क्षमतेने भरले. यानंतरही धरणात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे प्रशासनाने धरणातुन पाणी सोडण्याचा निर्णय पहाटे घेतला आहे. धरणाची पाणी पातळी ४३१.८० मीटर एवढी आहे .शनिवारी, रविवारी धरण क्षेत्रात जोरदार पाऊस पडल्याने धरण शंभर टक्के भरले. यामुळे धरणाचे ११ दरवाजे उघडण्यात आले आहेत. धरणात सध्या ६२ हजार ५१७ क्युसेस पाण्याची आवक आहे. तेवढ्याच क्षमतेने पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडण्यात येत आहे, अशी माहिती धरणाचे अभियंता बी.आर.शेख यांनी दिली. ११ दरवाजे खुले करण्यात आले असल्याने सिंदफणा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे सिंदफणा नदीपात्रालगत गावांतील ग्रामस्थांनी या बाबत सावध रहावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## शेकापकडून माजलगाव धरणाचे जलपूजन



माजलगाव : येथील जायकवाडी प्रकल्प टप्पा क्रं. २ माजलगाव धरण हे सोमवार, दि.६ सप्टेंबर रोजी धरण परिसरात जोरदार पाऊस झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने १०० टक्के भरल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांचा सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त करत सोमवारी दुपारी एक वाजता माजलगाव धरणाचे जलपूजन केले. यावेळी शेकापचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील, रंजित जाधव, राहुल वाघमारे, मुंजा पांचाळ उपस्थित होते.

## तातडीने संयुक्त पंचनामे करा : पालकमंत्री मुंडे

▶ प्रतिनिधी

बीड शेतकऱ्यांचा सर्वात महत्वाचा सण असलेल्या बैल पोळ्याच्या दिवशी शेतातील पिके पाण्यात आहेत, हातचे पीक पूर्ण जाईल की काय अशी भीती वाटत आहे. बीड जिल्ह्यात गेल्या दोन तीन दिवसात सर्वत्र सुरू असलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने मागील आठवड्यात जारी केलेल्या आदेशांना अनुसरूनच विमा कंपनी, महसूल व कृषी विभागाने संयुक्त पंचनामे करावेत असे निर्देश पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा प्रशासनास दिले आहेत.



मागील आठवड्यात पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समवेत आष्टी, गेवराई, बीड व वडवणी तालुक्यांचा दौरा करून पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार तात्काळ संयुक्त पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी दिले होते. आता पुन्हा जिल्ह्यात पडत असलेल्या पावसाने झालेले नुकसान आणखी जास्त असण्याची शक्यता आहे.

## शेटे कुटुंबियांचा मानाचा बैलपोळा



माजलगाव : सोमवारी पारंपरिक बैलपोळा सण माजलगाव शहरातील शेटे कुटुंबियांनी अतिशय साधेपणाने साजरा केला. परंपरेनुसार या बैल पोळ्याचा मान शेटे कुटुंबियांकडे आहे. याप्रसंगी विश्वनाथ शेटे आणि परिवार.

## जायकोचीवाडी दलित वस्ती सुविधांपासून वंचित

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महातपुरी ग्रामपंचायत कार्यालयांतर्गत येणाऱ्या जायकोचीवाडी येथे दलित वस्तीत रस्ते, पाणी, विद्युत आदी सुविधा उपलब्ध करून विविध योजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी माजलगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.

जायकोचीवाडी या गावात ३५० लोकवस्ती आहे. येथील दलित वस्तीत रस्ते, पाणी आणि विद्युतची सुविधा उपलब्ध नाही. तरी या वस्तीत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा सर्जेराव लोखंडे, भारत गायकवाड, उमेश थोरात, विशाल थोरात आदींनी दिला होता. दरम्यान, या निवेदनाची दखल गटविकास अधिकाऱ्यांनी घेतली असून तात्काळ कारवाईच्या सूचना दिल्या आहेत.

## राजेशिवाजी गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर

### मदन पांढरे यांना पंधराव्यांदा अध्यक्षपदाचा मान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील जिजामातानगर या भागातील नामांकित राजेशिवाजी गणेश मंडळ वर्ष २१ वे मंडळाची बैठक रविवार, दि.५ ऑगस्ट रोजी पार पडली. या बैठकीत यंदाच्या वर्षीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सलग पंधराव्यांदा अध्यक्षपदाचा मान मदन पांढरे यांना सर्वानुमते मिळाला आहे.



यंदा कोरोनामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता आरोग्य विषयक उपक्रम, रक्तदान शिबीर व सोशल डिस्टंसिंगचे पालन करून सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. मंडळाचे मार्गदर्शक ज्ञानेश्वर मेंडके, सुरेश शेटे, नितीन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यात अध्यक्षपदी मदन पांढरे, उपाध्यक्षपदी दीपक तोडकरी, सुरज एखंडे, सचिव नितीन चोरघडे, सहसचिवपदी किसन शिंदे, अमर देवकते, कोषाध्यक्षपदी दशरथ चोरघडे, विकास पाटील, अविनाश सोळंके, स्पर्धा प्रमुखपदी अमोल गिरी, ऋषिकेश कुलकर्णी आदींची निवड करण्यात आली आहे. तसेच जेष्ठ सल्लागार म्हणून सुरेश शेटे, प्रमुख सल्लागार म्हणून एकनाथ चोरघडे, भानुदास सोळंके, धनदीप कुलथे, गौरख शिंदे, प्रकाश सिरसट, महादेव सिरसट हे असणार आहेत. याप्रसंगी मंडळाचे सदस्य किसन शिंदे, विकास कदम, आशिष धवन, दीपक पाटील, महेश शेटे, उल्हास गायकवाड, महादेव एखंडे, गणेश तोडकरी, सुनिल एखंडे, विष्णू मोहिते, विलास कदम, कैलास मोहिते, अविनाश सोळंके, गोविंद सोळंके, नामदेव चोरघडे, आसाराम चोरघडे, लखन नायबळ, माऊली शिंदे, प्रशांत स्वामी, अमोल मेंडके, भारत ढगे, योगेश सिरसट, अमोल ढवण, संतोष खेत्री, संतोष केसापुरे, शुभम स्वामी, ईश्वर स्वामी, अजय चोरघर्डे उपस्थित होते.















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.